# सुराज्य सोलापूर



२६ जानेवारी प्रजासत्ताक दिनाच्या सर्व देशवासियांना शुभेच्छा

www.surajyadigital.com | गुरूवार, दि.२६ जानेवारी २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : १२१ वा किंमत : ५ रुपये | पाने ८


# भावकीतून एक कुटुंब संपलं, दुसरं गजाआड गेलं



**सुराज्य/यवत**

**एका पाठोपाठ एक असे सलग सात दिवसांत सात मृतदेह सापडले आणि दौंड तालुक्यातील अख्खा भीमाकाठ घाबरला. त्यातील तीन चिमुरड्यांचे कोवळे कोवळे मृतदेह पाहून भीमेच्या कडा पाणावल्या. सुरुवातीला हा प्रकार आत्महत्येचा वाटला. पण पोलिसांच्या तपासात वेगळीच माहिती पुढे आली आणि ही सामूहिक आत्महत्या नसून हत्याकांड असल्याचे स्पष्ट होताच दौंड तालुका हादरला. खुनाचा बदला खून करूनच घेण्याच्या ईर्ष्येतून भावकीने एक कुटुंब संपवले आणि त्यांना संपवणारे दुसरे कुटुंब गजाआड गेले. यासंदर्भातील माहिती पोलीस अधीक्षक अंकित गोयल यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत दिली.**

## भीमेच्या पात्रात आत्महत्या नव्हे हत्याकांड

### अटक आरोपी
अशोक कल्याण पवार (वय ६९), श्याम कल्याण पवार (वय ३५), शंकर कल्याण पवार (वय ३७) प्रकाश कल्याण पवार (वय २४), या आरोपींची बहीण कांताबाई सर्जेराव जाधव ( वय ४५, सर्व रा. ढवळेमळा, निघोज, ता. पारनेर, जि. नगर) यांना अटक करण्यात आली असून ही सर्व सख्खी भावंडे आहेत.

### खून का बदला खून
गेल्या चार महिन्यांपूर्वी आरोपी अशोक पवार याचा मुलगा धनंजय पवार आणि मृत मोहन पवार यांचा मुलगा अनिल पवार हे पुण्याला गेले होते. त्यावेळी वाघोलीजवळ अपघातात धनंजय पवार याचा मृत्यू झाला होता. यासंदर्भात पुणे पोलिसात अपघाताची नोंद करण्यात आली होती. मात्र तो अपघात नसून अनिल पवार आणि त्याचे वडील मोहन पवार यांनी धनंजय पवार याचा घात केल्याचा संशय अटकेतील आरोपींना होता. त्यांनी आपल्या मुलाचा खून केला आहे. त्याचा बदला त्यांचा खून करूनच घ्यायचा, या रागातून आरोपींनी मोहन पवार, त्याची पत्नी संगिता ऊर्फ शहाबाई मोहन पवार (वय ४०, दोघेही रा. खामगाव, ता. गेवराई, जि. बीड), श्याम पंडित फुलवरे (वय २८), राणी श्याम फुलवरे (वय २४), रितेश ऊर्फ भैय्या श्याम फुलवरे (वय ७), छोटू श्याम फुलवरे (वय ५), कृष्णा श्याम फुलवरे (वय ३, चौघेही रा. हातोला, ता. वाशी, जि. उस्मानाबाद) या सातजणांचा खून करून मृतदेह भीमा नदी पात्रात फेकून दिले.

### थंड डोक्याने घडवले हत्याकांड
दि. १७ जानेवारी रोजी रात्री अकराच्या सुमारास मोहन पवार हे पत्नी, मुलगी, जावई आणि तीन नातवंडांना घेऊन निघोज (ता. पारनेर, जि. अहमदनगर) येथून निघाले होते. ते पारगाव (ता. दौंड)जवळ आल्यानंतर आरोपींनी त्यांना अडवले. पहिल्यांदा आरोपींनी मोहन पवार- संगिता पवार, राणी व श्याम पंडित फुलवरे यांचा गळा दाबून त्यांना बेशुध्द केले. याचा कोणालाही संशय येऊ नये म्हणून त्यानंतर त्या चौघांचेही मृतदेह भीमा नदी पात्रात फेकून दिले. याचवेळी श्याम फुलवरे यांच्या रितेश ऊर्फ भैय्या श्याम फुलवरे (वय ७), छोटू श्याम फुलवरे (वय ५), कृष्णा श्याम फुलवरे (वय ३) या तिन्ही मुलांना जिवंतच भीमेच्या पात्रातील पाण्यात फेकून दिले.

### प्रेमप्रकरणाचा गैरफायदा घेणे पडले महागात
मृत मोहन पवार यांचा मुलगा अनिल पवार याने नात्यातीलच एका विवाहित तरुणीला पळवून आणले आहे. त्या तरुणीला तिच्या घरी अनिलने नेऊन न सोडल्यास सहकुटुंब आत्महत्या करण्याची धमकी मोहन पवार यांनी दिली होती. अनिलने त्या मुलीला न सोडल्यामुळे रागाने मोहन पवार हे पत्नी, मुलगी, जावई आणि नातवंडांसह दि.१७ जानेवारी रोजी रात्री निघोजमधून निघाले होते. तत्पूर्वी आरोपींनी मोहन पवार यांच्या कुटुंबाला रस्त्यात संपवून मृतदेह नदीपात्रात फेकून दिले. मुलाच्या प्रेमप्रकरणातून मृतांनी सामूहिक आत्महत्या केली असे भासवण्याचा प्रयत्न आरोपींना अंगलट आला आणि त्यांच्या हातात बेड्या पडल्या.

गेल्या आठवड्यात १८ जानेवारीपासून दररोज एक एक असे करत मंगळवार(दि.२४ जानेवारी) पर्यंत एकूण सात मृतदेह दौंड (जि. पुणे) तालुक्यातील पारगाव येथील भीमा नदीपात्रात सापडले. हे सातही मृतदेह एकाच कुटुंबातील असल्यामुळे हा सामूहिक आत्महत्येचा प्रकार असावा, असे सुरुवातीला वाटत होते. पण पोलीस तपासात ही सामूहिक आत्महत्या नसून भावकीच्या भांडणातून थंड डोक्याने घडवलेले हत्याकांड असल्याचे निष्पन्न झाले आणि अहमदनगरसह पुणे आणि उस्मानाबाद जिल्हा हादरला.

---

## पंढरीत एसटीच्या धडकेत महिलेचा मृत्यू

**सुराज्य/सोलापूर**

शाळा सुटल्यानंतर घरी जाणाऱ्या महिलेला एसटीची धडक बसल्यानंतर चाक डोक्यावरून गेल्यामुळे जागीच मृत्यू झाल्याची घटना शहरातील सरगम चौक येथे घडली.

या अपघातात भोसले चौक येथे राहणाऱ्या जयाबाई तुकाराम थिटे वय ६० या महिलेचा दुर्दैवीरीत्या मृत्यू झाला. एका खाजगी शाळेमध्ये नोकरी करणाऱ्या जयाबाई थिटे या शाळा सुटल्यानंतर बुधवारी दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास सरगम चौकातून घरी निघाल्या होत्या. यावेळी एम.एच. १४ बी.टी. ११९० या क्रमांकाची अकलूज-पंढरपूर ही राज्य परिवहन महामंडळाची बस रेल्वे पुलाखालून सरगम चौकाकडे जात असताना जयाबाई थिटे यांना तिचा धक्का लागल्याने त्याखाली पडल्या व चालकाला काही समजण्यापूर्वीच त्यांच्या डोक्यावरून बसचे चाक गेल्यामुळे त्या जागीच ठार झाल्या.

घटनेची माहिती मिळताच पंढरपूर शहर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक अजय भिंगारदिवे व वाहतूक विभागाचे पोलीस अंमलदार यांनी घटनास्थळी धाव घेऊन वाहतूक व्यवस्थित केली. याप्रकरणी एसटी चालक हमीद सय्यद याच्यावर पंढरपूर शहर पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## बेंबळे येथील शेतकऱ्याची साडेसहा लाखांची फसवणूक

**सुराज्य/सोलापूर**

ऊसतोड कामगाराची टोळी पुरवतो अशी थाप मारून बेंबळे (ता.माढा) येथील एका शेतकऱ्यास ६ लाख ६० हजार रुपये घेऊन फसवणूक करण्यात आली.

या प्रकरणात टेंभुर्णीच्या पोलिसांनी दत्ता जमनाजी करुळे (वय ३५ रा.धनसांगवी जि.जालना) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. दत्ता करोळे याने १ जुलै २०२२ रोजी शेतकरी गायकवाड यांना ऊसतोड कामगार पुरवतो असे सांगितले. लेखी करार करून ६ लाख ६० हजार रुपये घेतले. त्यानंतर त्याने मजूर पुरवले नाही आणि रक्कम देखील परत केली नाही. अशी फिर्याद गायकवाड यांनी पोलिसात दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी फसवणुकीचा गुन्हा दाखल केला. हवालदार हजारे पुढील तपास करीत आहेत.

## विजयवाडी विझोरी येथे घरफोडी; ३ लाख ६८ हजारांचा ऐवज लंपास



**अकलूज** : विजयवाडी विझोरी येथे एकाच रात्री दोन ठिकाणी चोरी झाली असून अज्ञात चोरट्यांनी दरवाजाचे कडी कोयंडे उचकटत ३ लाख ६८ हजाराचा रोख रकमेसहित मुद्देमाल पळविला आहे.

याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की,दिनांक २३ रोजी रात्री ११ ते दिनांक २४ रोजी पहाटे या दरम्यानच्या कालावधीत सुदाम तुळशीराम शेंडगे रा. विझोरी व अस्लम इस्माईल शेख रा. विजयवाडी यांच्या घरातील कडी कोयंडे उचकटून सदरची रक्कम अज्ञात चोरट्यांनी चोरली असून याबाबतची फिर्याद अकलूज पोलिसात दाखल झाली आहे. यामध्ये शेंडगे यांचे १लाख ४० हजार रुपयांचे सोन्याचे दागिने अडीच तोळे वजनाचे गंठण अर्धा तोळे वजनाची बोरमाळ अर्धा तोळे वजनाची अंगठी, १ लाख ५३ हजार कपाटात ठेवलेली रोख रक्कम, हिरो होंडा कंपनीची स्प्लेंडर मोटरसायकल चोरून नेली आहे. याबाबत घटनास्थळी उपविभागीय पोलीस अधिकारी डॉक्टर बसवराज शिवपुजे, पोलीस निरीक्षक अरुण सुगावकर यांनी तात्काळ भेट दिली असून पुढील तपास पोसई रामचंद्र हांडे हे करीत आहेत.

---

**सुराज्य**

### उद्याचा अंक नाही

भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त 'सुराज्य' कार्यालयास दि.२६ जानेवारी २०२३ रोजी सुट्टी असल्याने उद्या दि. २७ जानेवारी २०२३ चा अंक प्रकाशित होणार नाही, याची नोंद वाचक, विक्रेते, जाहिरातदार यांनी घ्यावी, ही विनंती.

-व्यवस्थापकीय संपादक

## प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला पद्म पुरस्कारांची घोषणा

**सुराज्य/सोलापूर**





भारत सरकारने ७४ व्या प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला पद्म पुरस्कारांची घोषणा केलीय. यंदाच्या वर्षी ६ पद्मविभूषण, ९ पद्मभूषण आणि ९१ पद्मश्री अशा एकूण १०६ जणांना पद्म पुरस्कार जाहीर झालेत. झाडीपट्टी रंगभूमीचे कलाकार परशुराम खुणेंना पद्मश्री पुरस्कार देण्यात आला आहे.

नक्षल प्रभावग्रस्त भागातील युवकांचे पुनर्वसन यासह सामाजिक कारणांसाठी लोकनाट्य कलेचा वापर करण्याच्या योगदानाचा सन्मान म्हणून परशुराम खुणे यांना पद्मश्री पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. चिकित्सा (बालरोग) क्षेत्रात ओआरएसचे जनक दिलीप महालनोबिस यांना पद्मविभूषण (मरणोत्तर) देण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पश्चिम बंगालमधील ८७ वर्षीय डॉक्टरांनी ओआरएसच्या व्यापक वापरासाठी पुढाकार घेतला, ज्यांनी जागतिक स्तरावर ५ कोटींपेक्षा अधिक जणांचा जीव वाचवला आहे. अंदमान आणि निकोबारमधील जोरबा जमातीमध्ये काम करणाऱ्या रतन चंद्र कार यांना पद्मश्री देण्याची घोषणा करण्यात आली आहे. याशिवाय हिरा बाई लोबी, मुनीश्वीर चंद्र डावर, रामकुई वांगवे न्यूमे, वीपी अप्पकुट्टन पुदुवाल, कपिल देव प्रसाद यांना पद्मश्री देण्यात आला आहे.

**पद्म विभूषण :** डॉ.दिलीप महलानाबीस (मरणोत्तर), झाकीर हुसेन (कला), एस.एम.कृष्णा (पब्लिक अफेअर्स), बाळकृष्ण दोषी (मरणोत्तर), श्रीनिवास वर्धन, मुलायमसिंह यादव

**पद्मभूषण :** एस.एल. भैरप्पा, कुमार मंगलम बिर्ला, दीपक धार, वाणी जयराम, स्वामी चिन्ना जियर, सुमन कल्याणपूर, कपिल कपूर, सुधा मूर्ती, कमलेश दी. पटेल

**पद्मश्री :** भिकुजी इदाते, राकेश झुनझुनवाला (मरणोत्तर), डॉ. परशुराम खुणे, डॉ. प्रभाकर मांडे, गजानन माने, रमेश पतंगे, रवीना टंडन, कूमी नरिमन वाडिया

## तीन महिन्यात ३० हजार शिक्षकांची भरती : फडणवीस

**मुंबई** : पुढील तीन महिन्यात ३० हजार शिक्षकांची भरती करण्यात येणार आहे, अशी माहिती देवेंद्र फडणवीस यांनी दिली. ते शिक्षक मेळाव्यात बोलत होते. यावेळी ते म्हणाले की, '२०१२ पासून शिक्षक भरती बंद होती, पुढच्या ३ महिन्यात ३० हजार शिक्षकांची भरती करणार आहोत. निवडणुका आहेत म्हणून फक्त घोषणा करायची हे आम्ही कधी करत नाहीत.' सर्वच जिल्ह्याकडून वाढीव मागण्या आल्या आहेत. मात्र आचारसंहिता असल्यामुळे सर्वच मागण्या मान्य करणे किंवा नव्या घोषणा करणे शक्य नसल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

स्वतंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त राज्यात %५ हजार नोकरभरती करण्यात येणार आहे. याची घोषणा शिंदे-फडणवीस सरकारने दोन महिन्यापूर्वी केली होती. राज्यात सध्या पोलीस भरतीची प्रक्रिया सुरु आहे. त्यातच आता फडणवीसांनी ३० हजार शिक्षकांच्या भरती करण्याची घोषणा केली आहे.

---

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



साहेब, तुमचं दरवर्षीचं भाषण सापडलं! फक्त तारीख बदलून वाचा!

| कल्याण |
| --- |
| ------- |

| मेन बाजार |
| --- |
| ------- |

## बालाजी दर्शन घेऊन परतताना अपघात; सोलापुरातील चौघांचा मृत्यू

- पाचजण गंभीर जखमी
- तवेरा कार धडकली थेट डिव्हायडरला
- जुळे सोलापुरातील रहिवासी
- कुटुंबावर शोककळा

**सुराज्य/सोलापूर**

तिरुपती इथं बालाजीच्या दर्शनासाठी गेलेल्या सोलापुरातील तरुणांच्या वाहनाला भीषण अपघात झाला असून, यामध्ये चार जणांचा जागीच मृत्यू झाला असून इतर पाच जण गंभीर जखमी झाले आहेत. त्यात अथर्व टेंभुर्णीकर, मयुर मुत्तन, ऋषिकेश जंगम व अजय लुट्टे या चौघांचा मृत्यू झाल्याचे स्थानिक पोलिसांकडून सांगण्यात आले आहे. जुळे सोलापुरातील नऊ जण तिरुपती बालाजी येथे चार चाकी कारने गेले होते.

तिरुपती बालाजी येथील दर्शन घेतल्यानंतर सोलापूरला वापस परतत असताना त्यांची कार डिव्हायडरला धडकल्याने हा अपघात बुधवारी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास चंद्रगिरी मंडळातील नायडूपेठ-पूथलापट्टू या मुख्य रस्त्यावर घडला. अपघात इतका भयानक होता की कारच्या समोरील भागाचा चुराडा झाला आहे.

भरधाव वेगाने निघालेली चार चाकी क्र.एम. एच.१२.पी.एच.९७०१ यातील चार जणांचा जागीच मृत्यू झाला तर इतर पाचजण गंभीररीत्या जखमी झाले.जखमींना तातडीने रुग्णवाहिकेतून तिरुपती रुईया रुग्णालयात हलवण्यात आले.घटनेची माहिती मिळताच पश्चिम डीएसपी नरसप्पा रुया रुग्णालयात पोहोचले. चंद्रगिरी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून तपास सुरू आहे.



या नऊ जणांनी तिरूपती बालाचीचे दर्शन घेतल्यानंतर सेल्फी काढला. त्यावेळी त्यांनी अशी पोज दिली होती.

### जुळे सोलापूरात हळहळ
दरवर्षी हे मित्र तिरुपती बालाजी येथे दर्शनासाठी जात असतात.२४ जानेवारीला मित्र राहुल इराणी याचा वाढदिवस असल्याने ते सोलापुरातून २३ जानेवारीला तिरुपती बालाजी येथे दर्शनासाठी निघाले होते. या सर्व मित्रांनी व्हीव्हीपी कॉलेजमध्ये इंजिनिअरिंग पूर्ण केलं असुन,एकाच गल्लीत राहत होते.हे सर्व मित्र सामाजिक कार्यक्रमात मोठ्या उत्सहाने सहभागी व्हायचे. अशी माहिती तेथील उपस्थित नागरिकांनी दिली. अपघाताची बातमी जुळे सोलापूर पसरतात तेथील परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.